# तोरण

अंक ९३ ऑक्टोबर–डिसेंबर २०१२

## अनुक्रमणिका

जैव विविधता संमेलन
१–१९ ऑक्टोबर २०१२,
हैद्राबाद: संमेलनाचा थोडक्यात
आढावा व संमेलनादरम्यान
आलेले अनुभव

## संपादकीय

आम्ही जैवविविधता ह्या विषयावर वेगवेगळ्या दृष्टीकोनातून आमचे विचार आधीच्या अंकामधून वेळोवेळी आपल्यापुढे मांडले आहेत. तथापि, ह्या अंकामध्ये आम्ही तुम्हाला हैद्राबादला घेऊन जातो आहोत. ऑक्टोबर २०१२ मध्ये हैद्राबादला जैवविविधता ह्या विषयावर खूप मोठे आंतरराष्ट्रीय संमेलन आयोजित केले होते. ह्या संमेलनात अनेक आंतरराष्ट्रीय तसेच भारतीय प्रतिनिधींचा सहभाग होता. जितेंद्र मैड ह्या व्यवसायाने पत्रकार असलेल्या संशोधक कार्यकर्त्याने आमच्याबरोबर येऊन हैद्राबादच्या संमेलनात भाग घेतला होता. तोरणच्या ह्या अंकामध्ये आम्ही मैड यांच्या शब्दात, त्यांना संमेलनाबद्दल काय वाटले ते सादर करत आहोत.

**डॉ. नित्या घोटगे**
संचालिका, अंतरा संस्था, पुणे

देणगी मूल्य : रु. ५/–

# जैवविविधता संमेलन

## १ ते १९ ऑक्टोबर २०१२, हैद्राबाद

## १. जैवविविधता संमेलन

प्रकृतिः रक्षति रक्षिता हे अर्थपूर्ण बोधवाक्य घेऊन हैद्राबाद येथे १ ते १९ ऑक्टोबर २०१२ पासून जैवविविधतेवर संमेलन संपन्न झाले. जैवविविधतेच्या बांधिलकीमध्ये झालेली प्रगती आणि त्याची अंमलबजावणी यावर २०११-२०२० या काळासाठी धोरणात्मक नियोजन आराखडा, अंमलबजावणीतील आव्हानावर येथे झालेली चर्चा हा आपल्यासाठी खरे पाहिले तर अत्यंत महत्वपूर्ण विषय आहे. त्यामुळेच त्याची माहिती ही प्रत्येक नागरिकाला होणे आवश्यक वाटते. या परिषदेत १९३ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यामध्ये अनेक देशातील सरकारच्या प्रतिनिधींबरोबरच विविध स्वयंसेवी संस्था, शेतकरी, आदिवासी, पशुपालक, मच्छीमार आदींचाही सहभाग होता. पुण्यातून अंतरा संस्थेच्या वतीने महेंद्र खताळ, अण्णा हाके या मेंढपाळांनी व संगिता खापरे, राजन कुळये या रत्नागिरीतील शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. मलाही अंतरातर्फे या संमेलनास अुपस्थित राहायची संधी मिळाली. जैवविविधतेचे संरक्षण आणि त्याचा शाश्वत उपयोग या दृष्टीने ही चर्चा महत्वाची असणार होती. परंतु या संमेलनाची मराठी प्रसारमाध्यमांनी दखल घेतली नाही ही खेदाची बाब आहे.

माणूस हासुध्दा एक जीव असल्याने व तसेच या परिसंस्थेचा घटक असल्याने जैवविविधता टिकून राहणे त्याच्या भल्यासाठी आवश्यक आहे. बदललेली जीवनशैली, आहारपध्दती, लोकसंख्यावाढ यांचा परिणाम निसर्गावर होत आहे. २००२ मध्ये जगातील बहुसंख्य देशांनी २०१० पर्यंत जैवविविधतेचा ऱ्हास रोखण्यासाठी जैवविविधतेवरील धोरणात्मक चर्चेत पुढाकार घेण्याचे मान्य केले होते. परंतु प्रत्यक्षात त्यात यश आले नाही. कारण यासाठी लागणाऱ्या खर्चाचा विचार कोणीही गंभीरपणे केला नाही. पृथ्वीचा ७१ टक्के भाग व्यापणाऱ्या सागरातील प्रदूषण वाढतच चालले आहे. समुद्रातील मासेमारीवर २० कोटी लोकांचा रोजगार अवलंबून आहे. सागरातील ज्या जीवजाती आपल्याला माहित आहेत त्यातील एकतृतियांश जीवजाती प्रवाळावर जगत असतात. त्यामुळेच युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रॅमने २०२० पर्यंत सागराच्या दहा टक्के भाग हा संरक्षित म्हणून जाहीर केला आहे. पाणथळ जागा, तिवरांची जंगले, गवताळ प्रदेश नष्ट होत चालले आहेत. पृथ्वीवरील जंगलात जगातील निम्म्याहून अधिक जीवजाती आहेत. त्यामुळे जंगले वाचविणे गरजेचे आहे.

हैद्राबाद येथील इंटरनॅशनल कन्हेशन सेंटर आणि आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शन येथे संयुक्त राष्ट्रसंघाचे संमेलन एकीकडे चालू होते, तर दुसरीकडे स्वयंसेवी संस्थांनी ''विविधतेसाठी एकता'' हा विषय घेऊन या संमेलनाला समांतर असा लोक जैवविविधता महोत्सव आयोजित केला होता. यामध्ये घोंगडी महोत्सव, आरोग्य महोत्सव, तांदूळ महोत्सव अशा विविध प्रदर्शनांचे आयोजन या निमित्ताने हैद्राबादमध्ये केलेले होते. लोकांनी आयोजित केलेल्या संमेलनाला सर्वांसाठी मुक्त प्रवेश होता. तर सरकारने आयोजित केलेल्या संमेलनात मात्र कडक सुरक्षा यंत्रणेच्या तपासणीतून, प्रवेशपत्र असणाऱ्यांनाच प्रवेश मिळत होता.

जैवविविधतेत भारत एक समृध्द राष्ट्र आहे. त्याचे एक मुख्य कारण म्हणजे आपल्याकडे शेती आणि पशुपालनाला मोठे महत्व आहे. परंतु दुर्भाग्याची गोष्ट ही की ही विविधता वेगाने नष्ट होत आहे.

शेतीच्या बदललेल्या पध्दतीमुळेसुध्दा जीवांची संख्या घटत आहे. विविध प्रजाती नष्ट होण्यामुळे आपल्या भविष्यातील वाटचालीबद्दल प्रश्नचिन्ह तयार होत आहे. पृथ्वीवरील पाणी, हवा, जमीन यामध्ये मोठे बदल होत असल्याने पर्यावरण हानीचा धोका वाढत आहे. त्यामुळे जैवविविधतेचे महत्व लक्षात घेऊन वाटचाल करणे गरजेचे आहे. सरकारी पातळीवर आणि लोक पातळीवर होणाऱ्या विचारमंथनातून येणाऱ्या मुद्यांवर सहमती घडवून आणण्यासाठीही प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने अशा संमेलनांचा, चर्चासत्रांचा निश्चितच उपयोग होऊ शकेल.

आपल्या देशात राष्ट्रीय जैवविविधता कायदा २००२ नुसार जैवविविधतेच्या देखरेखीसाठी तीन पातळ्यांवर व्यवस्था केली आहे. स्थानिक स्तरावर जैव विविधता व्यवस्थापन समिती, राज्य स्तरावर राज्य जैविविधता मंडळ (बोर्ड), आणि केंद्र स्तरावर राष्ट्रीय जैवविविधता संचलनालय (नॅशनल बायोडायव्हरसिटी ॲथोरिटी) आहे. याचे मुख्यालय चेन्नई येथे आहे. आत्तापर्यंत महाराष्ट्रासह २६ राज्यात बायोडायव्हरसिटी बोर्डाची स्थापना झाली आहे. केरल आणि मध्यप्रदेश ही राज्ये बायोडायव्हरसिटी व्यवस्थापन समितीच्या बांधणीत आघाडीवर आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याने यात मागे राहणे योग्य नव्हे.

## २. जैवविविधता का महत्वाची

मोठ्या प्रमाणावर जैवविविधता असलेले १७ मुख्य भाग आहेत. त्यामध्ये भारतसुध्दा आहे. भारतात जगातील १२ टक्के जैवविविधता आहे. पण त्यावर किती काम झाले, कोणत्या वनस्पती आणि सजीवांच्या गुणसूत्रांची ओळख होऊ शकली हा एक मुख्य प्रश्न आहे. लोकलेखा समितीच्या एका अहवालानुसार पर्यावरण आणि वन मंत्रालय यांना ४५००० वनस्पती आणि ९१ हजार जनावरांच्या प्रजातींची ओळख पटूनही जैवविविधतेच्या संरक्षणात अपयश येत आहे. पर्यावरण आणि वनमंत्रालयानुसार ''द बॉटनिकल सर्वे ऑफ इंडिया'' या संस्थेला ४६ हजार वनस्पती आणि ८१ हजार जीव-जंतूंची माहिती झालेली आहे. परंतु प्रत्यक्षात त्यांची संख्या लाखोंपेक्षा अधिक आहे.

यातील कटु सत्य हे आहे की गेल्या पाच दशकात हा देश अर्ध्याहून अधिक जंगल, ४० टक्क्याहून अधिक मॅनग्रोव्ह (नदी किनारावरील दलदलीच्या जमिनीवर असणारे उष्ण कटीबंधीय वृक्ष, ज्यांची मुळे जमिनीच्या खाली जातात) आणि मोठ्या प्रमाणातील दलदलीची जमीन गमावून बसला आहे. वनस्पती आणि जनावरांच्या असंख्य प्रजाती नष्ट झालेल्या आहेत. आणि शेकडो प्रजाती आपले अस्तित्व वाचवण्यासाठी संघर्ष करत आहेत.

पश्चिम घाट हा जगातील १४ अशा भागापैकी एक आहे की जो आपल्या जैवविविधतेसाठी ओळखला जातो. हा प्रदेश २७ टक्के वनस्पतीं, तसेच जागतिक स्तरावर आपल्या अस्तित्वासाठी झगडणाऱ्या ३२५ पक्षी, उभयचर, सरपटणारे, माशे यांचे आगर आहे.

परंतु वृक्षतोड, खाणकाम आणि अतिक्रमण यामुळे पश्चिम घाटातील परिसंस्थेवर परिणाम होत आहे. त्यामुळे त्याचे संरक्षण करणे खूप महत्वाचे आहे कारण आपला देश ही फक्त राष्ट्रीय नव्हे तर वैश्विक धरणी आहे.

युनेस्कोने पश्चिम घाटातील १६ हजार वर्ग किमी क्षेत्रातील दहा स्थानांना विश्वाची धरोहर घोषित केले आहे. हैद्राबाद येथे होत असलेल्या विश्व संमेलनाची एक सकारात्मक बाजू ही आहे की यातून आपण सजग, संवेदनशील राहू. जैवविविधतेतील समृध्दीमुळेच आमचे अस्तित्व टिकून आहे. त्यासाठी आर्थिक विकासाबरोबरच जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी सतर्क राहणे गरजेचे आहे. सरकार आणि लोक या सर्वांची ही जबाबदारी आहे.

❖ ❖

## ३. धनगराने संमेलनात मांडली आपली बाजू

जैवविविधता संमेलनात अनेक चर्चासत्रे झाली. अंतरा संस्थेने भारतातील ''हरवलेले चराऊ रान'' हा विषय घेऊन एक चर्चासत्र आयोजित केले होते. वन जमीन, वाळवंट, समुद्री जमीन हे सर्व या फूले, पाने आणि विविध जीवजातींनी समृध्द असल्या, तरी या जमिनींच्या मुद्याकडे नेहमीच दुर्लक्ष केले गेले आहे. या विषयावरील चर्चेत भारतीय वन सेवेच्या अधिकारी, ज्या सध्या मध्यप्रदेशच्या ग्रामीण विकास मंत्रालयात काम करतात त्या डॉ. सुवर्णा, बॉम्बे नॅचरल हिस्टरीचे डॉ. रंजित, पशु आरोग्य तज्ञ, तसेच महाराष्ट्र, गुजराथ, तामिळनाडू, राजस्थान, केरळ, आंध्र प्रदेशातील पशुपालकांनीही आपली मते मांडली.

सहजीवन, बॉम्बे नॅचरल हिस्टरी फाउंडेशन, समवेदना, वॉटरशेड ऑर्गनायझिंग ट्रस्ट, शिवसेनापती कांगेयाम कॅटल रिसर्च फौंडेशन आदी संस्था सहभागी झाल्या होत्या.

चराऊ रानातील या जमिनीत गेंडा, लांडगे, माळढोक सारखे विविध पक्षी, हरीण, घोरपड, साप, किटक आदी जैवसंपदा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामध्ये धनगर, पारधी, मालधारी यांच्यासारख्या फिरस्त्या पशुपालक जमाती वावरत असतात. या जमिनीत शेत जमिनीपेक्षा अधिक जैवविविधता आढळते.

लँटाना (घाणेरी किंवा टणटणी) सारख्या आक्रमक प्रजाती चराऊ रानातील जैवविविधता नष्ट करत आहेत. ग्रामपंचायतीव्दारे निलगीरीसारखी अयोग्य झाडे लावली गेली. चराऊ रानाला नेहमी पड जमीन हा शब्द वापरला गेला. पड जमीन हा शब्द ब्रिटीश सरकारची देण आहे. ज्या जमिनीतून कर, महसूल मिळत नाही तिचा पड जमीन असा उल्लेख केला गेला. तेव्हापासून जैवसृष्टीने समृध्द असलेल्या या जमिनी पड जमिनी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. आता याच जमिनी शहरीकरण, औद्योगिकरण, बागायतीकरण, आदींसाठी भूविकासाच्या नावाखाली वाटल्या जात आहेत.

पशुंना वनक्षेत्रात बंदी असावी कारण त्यांच्यामुळे जंगल क्षेत्र कमी झाल्याचा आरोप केला जातो. या आरोपाला पशुपालकांनी आपल्या अनुभवांची जोड देत चोख उत्तर दिले. त्यांना आपली मते मांडायला इथे चांगला मंच मिळाला. जेथे चराई बंद आहे तेथील चारा



चर्चासत्रात महेंद्र खताळ धनगर समाजाच्या वतीने आपले अनुभव मांडताना

संपला आहे, एवढे कायदे केले तरी वाघ नष्ट होत आहेत याला जबाबदार कोण असा प्रश्न पशुपालकांनी उपस्थित केला. पशुंची पावले जेथे पडतात ती जमीन दबली जाते. त्यामध्ये पाणी साठते. त्यांच्या मलमूत्रामुळे जमीन सुपीक होते. पशुंच्या मलातून बाहेर पडणाऱ्या बीया चांगल्या रुजतात. विकासाच्या नावाखाली लूटमार करणारे स्वतःच्या चुकांचे खापर आमच्यावर फोडत आहेत असे पशुपालकांनी विविध उदाहरणे देत सांगितले. पशु पक्षी आणि जंगली जनावरे यांचे नाते आहे. ते ऐकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांना एकमेकांपासून दुर करु नका असे आवाहन या पशुपालकांनी केले.

एक अभ्यासक म्हणाला की, मेंढ्या जंगल क्षेत्रात शिरल्यास त्यांना काही संसर्गजन्य आजार झाले असतील तर ते आजार हरणे वा तत्सम पशुंना होऊ शकतात. त्यामुळे जंगल क्षेत्रात चराई बंदी असावी. त्याला आक्षेप घेत महेंद्र खताळ यांनी स्वानुभव सांगितला. खताळ म्हणाले, मिलेट्रीने झाडे लावण्यासाठी लाखो रुपये खर्च केले. पण झाडे आली नाहीत. नंतर एका अधिकाऱ्याने असा निर्णय घेतला की मिलेट्रीच्या परिसरात मेंढपाळ सोडू. त्या भागात मेंढरे फिरली तशी झाडे वाढली. कारण मेंढी, शेळीने कोणती वस्तू खाल्ली की तिच्या पोटातून जे बी बाहेर पडते त्यात उगवण क्षमता जास्त असते. (उदा. बाभूळ, बोर खाऊन लेंडीतून बी पडले की).

सुरुवातीला त्या जागेत झाड तर नव्हतेच पण चिमणीसारखे पाखरुसुध्दा नव्हते. आता तेथे जंगल झाल्यामुळे हरणे, ससे, तरस, लांडगा, बिबट्या, मोर, माकड, चित्तूर पक्षी, कोल्हा, रानडुक्कर, उद, जंगली मांजर असे नाना प्रकारचे प्राणी आढळू लागले आहेत.

मेंढरे आणि हरणे दोघांचे खाद्य गवत, विविध प्रकारची तणे, वनस्पती हे आहे. भादवा ते दसरा हा हरणांच्या वीणीचा काळ. त्यावेळी आम्हा मेंढपाळांचा ढवळपुरीच्या रानात वावर असतो. आम्ही जेव्हा मेंढरे घेऊन माळोमाळ भटकतो, तेव्हा हरणांच्या कळपांची आणि आमची बरेचदा गाठभेट होते. ज्या भूमीवर मेंढरे चरतात त्या भूमीवर हरणेसुध्दा चरत असतात. मेंढरांचे लांडग्यांपासून संरक्षण व्हावे म्हणून आम्ही नेहमी जागरुक असतो. विविध प्रकारचे आवाज करुन आम्ही लांडग्यांना लांब ठेवतो. आमची कुत्री लांडग्यांना पळवून लावतात. ती जर हरणांच्या मागे लागली तर आम्ही त्यांना दोरीने बांधतो. त्यामुळे दिवसा हरणांचे संरक्षण आमच्याकडून होते. रात्री हरणे रानात जातात. या काळात लांडगे आमच्या वाड्यावरचे मेंढरु पळवता येईल का यासाठी दबा धरुन बसतात. म्हणून आमच्या मेंढरामुळे हरणे वाढली असे म्हटले तर वावगे होणार नाही. फेटा न बांधलेला कुणीही माणूस दिसला की हरणे पळतात. पण फेटेवाला असेल तर त्यांना काही वाटत नाही.

मेंढ्यांच्या वावरामुळे या भागात पाऊस पडतो. धनगर समाज मेंढ्यांना लक्ष्मी मानतो. साहजिकच जिथे लक्ष्मीचा वावर तिथे पाऊस

पडणार, धान्य पिकणार, सगळं चांगलंच होणार. मेंढीवर त्यांची उपजिवीका अवलंबून असते म्हणून ती त्यांची लक्ष्मीच आहे. शिवाय मेंढी कोणतीही घाण खात नाही. ती निर्मळ गवत खाते. स्वच्छ राहणे मेंढीला आवडते. घाण पाणी मेंढी पित नाही. तिचा निर्मळपणा तिच्यातले देवत्व दाखवतो.

पशुवैद्य असलेले डॉ. कुंदास्वामी म्हणाले की, लसीकरण मोहीम व्यवस्थित झाली तर मेंढ्यामुळे जंगली जनावरांना आजार होण्याची भिती बाळगण्याचे कारण नाही. पण लसीकरण व्यवस्थित होत नाही हे सरकारचे अपयश आहे.

जेथे रिझर्व्ह फॉरेस्ट आहे ती जागा खाणकाम किंवा इतर गोष्टींसाठी कशी वापरतात असा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. चराईची फी घेऊन वनखात्यालासुध्दा काही पैसे मिळू शकतात. जंगलावर फक्त आदिवासी वा पशुपालकच अवलंबून नाहीत. स्मगलर, शिकारी यांचे नेटवर्कसुध्दा मोठे आहे. त्याचा बंदोबस्त करणे हे आपल्यापुढचे आव्हान आहे. जंगल म्हणजे फक्त उंच झाडी नव्हे. खुरट्या झुडपांचेसुध्दा जंगल असू शकते. खडकाळ माळरान, वाळवंट, दलदलीच्या जमिनी, अशा विविध प्रकारच्या जमिनीत आढळणाऱ्या जैवसाखळ्यांकडे दुर्लक्ष करु नये. पड, निरुपयोगी जमीन म्हणून त्याकडे पाहू नये अशी भूमिका काहीजणांनी मांडली. राष्ट्रीय चराई धोरण आखले जावे, संयुक्त वन व्यवस्थापनाचा विचार व्हावा अशी मागणी चर्चासत्रातून पुढे आली. शेवटी एकमेकाला समजून घेऊन पुढे चालले पाहिजे यावर सर्वांचे एकमत झाले.

❖ ❖

# ४. जैवविविधता परिषदेदरम्यान आलेले अनुभव

## ४अ : रामनाथपूर नव्हे रामंथपूर

अंतरा या पशुपालकांमध्ये काम करणाऱ्या संस्थेच्यावतीने महेंद्र खताळ आणि अण्णा हाके या ढवळपुरी, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथील धनगरांना धनगरांच्या समस्या मांडण्यासाठी निमंत्रित केले होते. त्यांच्याबरोबर कार्यकर्ता म्हणून मी होतो. दहा तारखेला आम्ही हैद्राबादला पोहचले. आमची राहण्याची व्यवस्था डॉन बॉस्को, रामंथपूर येथे केली होती. निवासाच्या जागेचा पत्ता इंग्रजीत आला होता. त्यानुसार रामनाथपुरला जायचे आहे असे जेव्हा रिक्षावाल्याला सांगितले तेव्हा त्याने आम्हाला रामपुर, रामनगर अशी नावे सांगायला सुरुवात केली. रामनाथपुर हैद्राबादमध्ये नसल्याचा दावा केला. सगळ्याच रिक्षावाल्यांकडून अशी उत्तरे मिळाल्यावर डॉन बास्को येथे फोन लावला तेव्हा रामनाथपूर नव्हे रामंथपूर असे असल्याचे समजले.

## ४ब : येथे घुसणे सोपे नाही बाबा....

संयुक्त राष्ट्रसंघाच्यावतीने आयोजित केलेल्या परिषदेत सहभाग घेण्यासाठी प्रत्येकाला प्रायोरिटी पास असणे बंधनकारक होते. हा पास मिळवण्यासाठी रितसर अर्ज करणे आवश्यक होते. ज्यांनी रितसर अर्ज करुन पास मिळविला आहे अशांना आपले छायाचित्र असलेले ओळखपत्र दाखवूनच आतमध्ये प्रवेश मिळत होता.

आम्ही सेमिनारच्या जागेवर जायला निघालो. खताळ व हाकेचा पास आलेला

नव्हता. माझा पास होता. आम्ही तिघे हायटेक्स सिटी येथे पोहचलो. तेथे जवळच शिल्पग्राम आहे. पोलिस बंदोबस्त मोठा होता. आम्ही पोलिसांना प्रदर्शनाकडे जायचा रस्ता विचारला. त्यांनी एका मैदानाकडे बोट दाखवले. तेथे तपासणी यंत्रणा होती. यंत्राने तपासणी करताना अण्णाच्या खिशात असलेला चाकू सापडला.

मेंढ्यांच्या पायातील काटे काढण्यासाठी अण्णा हाके चाकूचा वापर करतात. पण पोलिसांनी तो चाकू आणि मोबाईलचे चार्जर काढून घेतले. खास पितळी धातूचा असलेला हा चाकू पोलिसांनी काढून घेतल्यावर हाकेच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि दुःखाची छाया पसरली. पोलिसांनी आम्हाला पुढे उभ्या असलेल्या ट्रॅव्हलर बसमध्ये बसायला सांगितले. या गाडीत सोबत दोन पोलिस होते. या गाडीने आम्हाला पुन्हा एका चेक नाक्यावर आणून सोडले. तेथे पुन्हा आमची तपासणी झाली. त्यात खताळच्या साखळीमुळे धातूशोधक यंत्राचा आवाज झाला. पोलिसांनी जास्त चेक केले तेव्हा ती कमरेची साखळी असल्याचे लक्षात आले. चाकू काय किंवा साखळी काय धनगर समाजासाठी ती व्यावसायिक व सांस्कृतिक दृष्ट्या गरजेची गोष्ट होती. येथील सुरक्षा व्यवस्थेची चौकट आणि त्यांची सामाजिक चौकट यात जमीन अस्मानाचा फरक होता. पोलिसांनी पुन्हा आम्हाला दुसऱ्या गाडीत बसायला सांगितले. आम्ही त्या गाडीतून पुढे निघालो. वाटले की आता आम्ही बरोबर आत जाणार. पण परत एक चेकपोस्ट लागले. जैवविविधता यात्रेसाठी ठेवलेला हा चोख बंदोबस्त वाखाणण्याजोगा होता. पण त्यामुळे आमच्यासारख्या सर्वसामान्य माणसांना बराच वेळ ताटकळावे लागले. नेहमी उपयोगी असणारा चाकू हाकेला टाकून द्यावा लागला. पण एवढ्या बंदोबस्तातही खताळचे नाचकन (कानकोरणे) मात्र पोलिसांच्या तपासातून सुटले होते. आम्ही चेकपोस्टला उतरलो. तेथे आम्हाला प्रायोरीटी पास विचारला. मी माझ्याजवळचा पास दाखवला. खताळ व हाकेचा पास आला का ते पहायचे आहे असे सांगितले. पोलिस म्हणाले, मागे जा आणि त्यांच्याकरिता पास घेऊन या, तुम्हाला एकट्याला आत जाता येईल. या दोघांना सोडून मी एकटे आत जाणे बरोबर नव्हते. हे दोघे कोठे थांबणार असा विचार करुन मी त्यांना घेऊन पुन्हा मागच्या चेकपोस्टला आलो. तेथे पास उपलब्ध होत नाही असे पोलिसांना सांगून शेजारीच असलेल्या तळ्याच्या काठी बांबूच्या सावलीत दोघांना बसायला सांगितले. मी आत दोघांचा पास मिळतो का हे बघायला गेलो.

प्रायोरीटी पास व स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (मतदार ओळखपत्र) असल्यामुळे मला आत प्रवेश मिळाला. तेथे असलेल्या रजिस्ट्रेशन काऊंटरवर माझा पास दाखवला. खताळ आणि हाकेच्या पासची चौकशी केली. तेथील बाईंनी कॉम्प्युटरवर तपासले. पण दोघांचाही पास नव्हता. त्यांनी तेथील संगणकावर माझे छायाचित्र काढून मला आतमध्ये प्रवेशासाठी लागणारे ओळखपत्र दिले. ते गळ्यात घालून मी खताळ व हाकेच्या जवळ आलो. तुमचा पास मिळावा म्हणून संस्था करत असलेल्या प्रयत्नाची त्यांना माहिती देऊन आम्ही पुन्हा डॉन बास्कोकडे गेलो. त्यांना पास मिळावा यासाठी पुन्हा प्रयत्न केल्यानंतर अकरा तारखेला हाके यांचा पास मिळाला. परंतु त्यांच्याकडे स्वतःचे छायाचित्र

असलेले ओळखपत्र नसल्यामुळे प्रवेश मिळाला नाही. हाकेचे वय १७ असल्यामुळे त्याला मतदार ओळखपत्रही नव्हते. त्यामुळे दुसरा दिवस आम्हाला हैद्राबाद येथील शिल्पग्राम, गोवळकोंडा किल्ला, कार म्युझियम, चार मिनार ही स्थळे पाहण्यात घालवावा लागला. तिसऱ्या दिवशी मोठ्या प्रयत्नानंतर खताळ यांचा प्रायोरीटी पास मिळाला. त्यामुळे खताळ व मला प्रवेश मिळाला. पण हाके यांना मुक्त प्रवेश असलेल्या प्रदर्शनात बसावे लागले.

– जितेंद्र मैड

**बुक-पोस्ट**

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : **anthra.pune@gmail.com**
वेबसाईट : **www.anthra.org**